☏- 02462-244474, 234504
फॅक्स क्रं. - 02462-235103

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

नियंत्रण कक्ष ☏ - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

जा.क्रं./ प्रेस नोट / 336 / पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड /2025 / दिनांक : 29 / 08 / 2025

# 1)खुनाचा प्रयत्न :-

**विमानतळ :-** दिनांक 25.08.2025 रोजी 22.30 वा. चे सुमारास, **साईबाबा मंदिर समोर, नांदेड येथे,** यातील आरोपी नामे 1. रवि हाडसे रा. चैतन्यनगर नांदेड 2. रतन लोखंडे, रा. अरूणोदय नगर नांदेड 3. अजय जोंधळे, रा.दिपक नगर नांदेड 4. प्रितम उर्फ चिंटू शिवानंद थोरात, रा. सांगवी बु नांदेड यांनी संगणमत करून गाडी क्रमांक एमएच/03 बिएस-8502 यामध्ये येवून फिर्यादी हे साईमंदिर जवळ दहिहंडीचे डेकोरेशन पाहत असताना फिर्यादीस विनाकारण अश्लील शिवीगाळ करून पोटावर, हातावर मारून गंभीर जखमी केले. तसेच यातील फिर्यादीचे मित्र नामे गोविंद देवराव गच्चे यास विटने मारून गंभीर जखमी करून खुन करण्याचा प्रयत्न केला. वगैरे **फिर्यादी विनोद गंगाधर गजभारे, वय 32 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. विकास नगर तरोडा, नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 330/2025 कलम 109,118(2),296,352,3(5), बीएनएस-2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री जोधंळे, मो. नं.** 9175324824 हे करीत आहेत. **सदर गुन्हयातील दोन आरोपींवर अटकेची कार्यवाही करण्यात आली असून अधिक तपास सुरू आहे.**

# 2)जबरी चोरी :-

**मुदखेड :-** दिनांक 27.08.2025 रोजी 12.30 वा. चे सुमारास, **कामळज ते देवापूर जाणारे रोडवर,** यातील नमुद आरोपी नामे 1. अजय राजु कोकरे, व इतर तीन आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीस रोडवर आडवून फिर्यादी जवळील भारत फायनान्स ची वसुली केलेले नगदी 58,525/-रू एक सॅमसग कंपणीचा टॅब किंमत 12,000/-रू व बायोमॅट्रीक डिव्हाईस किंमत 7,000/-रू असा एकुण 77,525/-रू चा मुद्देमाल जबरीने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी सतिश नारायणराव आहिले, वय 24 वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी भारत फायनान्स रा. रापतवार नगर उमरी ता. उमरी जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुदखेड** गुरनं 150/2025 कलम 309(4),3(5) बीएनएस- 2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/शिंदे, मो. नं.** 9579613649 हे करीत आहेत. **सदर गुन्हा उघडकीस आला असून आरोपी ताब्यात आहेत अधिक तपास सुरू आहे.**

# 3)गंभीर दुखापत :-

**विमानतळ :-** दिनांक 26.08.2025 रोजी 18.30 वा. चे सुमारास, **नुरी चौक तारा पान शॉपचे जवळ नांदेड येथे,** यातील आरोपी नामे 1. शेख आयान शेख अफजल, वय 19 वर्षे, रा. माळटेकडी 2. बाबा, पुर्ण नाव माहिती नाही 3. पचीस, पुर्ण नाव माहिती नाही 4. एक अनोळखी इसम यांनी संगनमत करून यातील फिर्यादी हे हॉटेलमध्ये चहा पित असताना आयान शेख याचे सोबत का राहत नाहीस असे म्हणून हातातील लाकडाने डाव्या हातावर व पायावर मारहाण करून फ्रॅक्चर करून गंभीर दुखापत केली. व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी अब्दूल बबलु अब्दुल वकील, वय 22 व्यवसाय मजुरी रा. पवना ता हिमायतनगर ह. मु. बसंतानगर नुरीचौक नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 331/2025 कलम 118(2),118(1),352,115,351(2),(3),3(5) बीएनएस-2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोउपनि/जाधव, मो.नं.** 9423621252 हे करीत आहेत.

# 4)प्रोव्हिबिशन :-

**1)भोकर :-** दिनांक 28.08.2025 रोजी 15.25 वा. सुमारास, **मौ. किनी ता. भोकर जि.नांदेड येथे,** यातील आरोपी नामे नविनरेड्डी नारायणरेड्डी मामीलवाड, वय 35 वर्षे, रा. किनी ता. भोकर हा विना परवाना बेकायदेशिररीत्या सिंधी दारू किंमत 4050/-रू चा मुद्देमाल चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळून आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/659 संजय लक्ष्मण माळकोटे, ने. पोस्टे भोकर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरनं 438/2025 कलम 65(ई) म.प्रो.का. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2078 लक्षटवार,** मो.नं. 9767114720 हे करीत आहेत.

**2)अर्धापूर :—** दिनांक 28.08.2025 रोजी 18.23 वा. सुमारास, **मौ. कामठा ता. अर्धापूर जि.नांदेड येथे,** यातील आरोपी नामे नविन परविंदर जिवनसिंग कामठेकर, वय 49 वर्षे, रा. कामठा ता. अर्धापूर हा विना परवाना बेकायदेशिररीत्या देशी दारू संत्रा भिंगरी किंमत 12,320/—रू चा मुद्देमाल चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळून आला. वगैरे **फिर्यादी पोनि/चंद्रशेखर आनंदराव कदम, ने. पोस्टे अर्धापूर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापूर** गुरनं 200/2025 कलम 65(ई) म.प्रो.का. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1279 चव्हाण,** मो.नं. 9356628317 हे करीत आहेत.

## 5)विज पडुन मृत्यु :—

**मांडवी :—** दिनांक 28.08.2025 रोजी 13.30 वा. चे सुमारास, **शिरपूर शिवार ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे महादेव मारोती उडकुडकर, वय 38 वर्षे, व्यवसाय शेती रा. शिरपूर ता. किनवट जि. नांदेड,** हा त्यांचे शेतात पिकांना खत टाकत असताना अचानक अंगावर विज पडून मरण पावला. वगैरे **खबर देणार प्रिया महादेव उडकुडकर, वय 33 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. शिरपूर ता. किनवट जि. नांदेड,** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे मांडवी** आ. मृ. **20**/2025 कलम 194 भारतीय नागरीक सुरक्षा संहिता—2023 कायदा प्रमाणे दाखल असुन **तपास मपोहेकॉ/1366 कनाके, मो.नं.** 9307138735 हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी,
पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड